## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

## (दिनांक २४/०३/२०२६)

वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्याने स्वतः, मुखत्यार, एजंट, नोकर, चाकर, नातेवाईक अगर अन्य कोणाकरवी राजकीय दबाव आणुन त्याने मा. उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांचेमार्फत दावा मिळकत शेतजमीनीची मोजणी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

२. **दावा मिळकतीचे वर्णनः–**

जिल्हा सोलापुर उपजिल्हा माळशिरस पैकी मौजे कोंडबावी येथील शेतजमीन खालीलप्रमाणेः

| गट क्रं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ८१/१/अ/२/अ/२/ब | २.५६ | १.६० |
| फेरफार क्रं. १३५१ ने महाराष्ट्र शासन पाझर तलावसासाठी सन १९९४ पुर्वी संपादित करण्यात आलेली जमीन. संपुर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाहीत. | | |

(वर नमुद मिळकत यापुढे सोयीकरीता ‘दावा मिळकत’ असे संबोधण्यात येत आहे.)

## वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–

४. दावा मिळकत पुर्वी वादी, प्रतिवदी व त्यांचे आई वडील भाऊ यांचे वडीलार्जीत मालकी वहिवाटीची होती. वादी, प्रतिवादी व त्यांचे वारस यांचेमध्ये गट क्रं. ८१ ही संपुर्ण शेतजमीन एकत्रात असताना सन १९९४ साली दावा मिळकत महाराष्ट्र शासनाने पाझर तलावासाठी संपादित केली. त्यानंतर वादीने माळशिरस येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.२५/१९९५ रोजी वाटपाकरीता दावा दाखल केलेला होता. त्यानुसार वादी, प्रतिवादी व त्यांचे भाऊ, आई वडील यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप झाले. त्यानंतर प्रतिवादी याने मे. कोर्टात रे.मु.नं. ८७८/२०२२ हा दावा गट क्रं. ८१/१/१ क्षेत्र २.५५ हे.आर, पो.ख. १.१६ हे.आर व गट क्रं. ८१/१/१ पैकी पुर्वेची १.१४ हे.आर या मिळकतीबाबत वादी विरुध्द जमीनीची मोजणी होवुन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दावा दाखल केला. प्रतिवादीने दावा मिळकतीचा बनावट ७/१२ उतारा तयार करुन त्याचे नाव नोंद केलेले आहे. त्याबाबत मा. तहसिलदारसाो यांचे निदर्शनास आणुन तक्रार केली असता मा. तहसिलदारसाो माळशिरस यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अनुसार चौकशी करुन सदर बनावट ७/१२ उतारा रद्द केला.

५. वादी पुढे कथन करतो की, तसेच प्रतिवादीने राजकीय दबाव आणुन ग्रामसेवक कोंडबावी यांची बनावट सही करुन भुमि अभिलेख माळशिरस यांचेमार्फत दावा मिळकतीची मोजणी करण्याचा प्रयत्न केला व सदर जमीन स्वतःचे मालकीची आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर प्रतिवादीने महसुल अधिका–यांशी

संगनमत करुन उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांचेमार्फत दावा मिळकतीची मोजणी मागविली. त्याप्रमाणे दिनांक ०३/११/२०२५ रोजी गावातील लोकांना नोटीस आली. परंतु वादी अगर पाझर तलावालगतचे शेतकरी कैलास नामदेव रेडेकर, नागेश ज्ञानदेव रेडेकर, संजय नामदेव रेडेकर यांना मोजणीची नोटीस आली नाही. त्यामुळे दिनांक १०/११/२०२५ रोजी यातील वादी व इतर लगत शेतकरी यांनी उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांनी सदर मोजणी करु नये यासाठी तक्रारी अर्ज दिला. त्याप्रमाणे मोजणी झाली नाही. वास्तविकता महाराष्ट्र शासनाने पाझर तलावासाठी दावा मिळकत संपादित केली ती तशीच पडून आहे.

६. सदर दावा मिळकत संपादित करताना त्याच्या हद्दीखुणा केलेल्या नाहीत अथवा कब्जा नाही याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी सदर मिळकत हडप करण्याच्या प्रयत्नात आहे. वास्तविकता गट क्रं. ८१ या जमीनीची मोजणी करावयाची झाल्यास सर्व पोटहिश्याची मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त दावा मिळकतीची मोजणी करता येणार नाही. तसेच लगत सर्व शेतकरी यांना मोजणी नोटीस देणे बंधनकारक आहे. प्रतिवादीने मोजणीच्या आधारे स्वतःचीच मालकी सांगुन कब्जा घातलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीस तुर्तातुर्त ताकीद देणेत यावी अशी विनंती केलेली आहे.

## प्रतिवादीचे प्रस्तुत अर्जास कथने खालीलप्रमाणेः–

७. प्रतिवादीने निशाणी क्रं. २६ वर अर्जास म्हणणे व कैफियत दाखल करुन कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतो की, दावा मिळकत ही जिल्हा

परिषद मार्फत पाझर तलावासाठी संपादीत झाली असुन त्यात वादी अथवा प्रतिवादीचा काहीही हक्क हितसंबंध नाही. सदरचे पाझर तलाव क्षेत्र हे ग्रामपंचायतीचे ताब्यात आहे. वादीची जमीन दावा मिळकतीलगत असलेने वादीने सरकारी क्षेत्रात अतिक्रमण करुन वहिवाट घातली आहे व त्यात विहिर व बोअर पाडले असुन वादी अतिक्रमीत क्षेत्र बेकायदेशीर वहिवाटीत आहे. त्याबाबत प्रतिवादीने जिल्हाधिकारी सोलापुर यांचेकडे तक्रारी केले नंतर जिल्हाधिकारी यांचे हुकूमाप्रमाणे ग्रामपंचायत कोंडबावी यांनी पाझर तलावाचे क्षेत्र मोजणी करुन अतिक्रमण काढुन घ्यावे असा आदेश झालेनंतर मोजणी मागविली आहे. त्यामुळे या मोजणीशी प्रतिवादीचा काहीही संबंध नसुन प्रतिवादीस मोजणी करु नये अशी ताकीद देणेचा या कोर्टास अधिकार नाही. दावा मिळकतीची मोजणी ही सरकारी अधिकारी यांचे आदेशावरुन ग्रामपंचायतीने मागविलेली असुन सदर दाव्यात ते पक्षकार म्हणुन सामील नाहीत.

८. प्रतिवादी पुढे कथन करतो की, वादीने दावा मिळकतीत अतिक्रमण केल्याचे उघडकीस आल्याने वादीने प्रस्तुत खोटा दावा प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. मोजणी करणेचा हक्क हा कायदेशी असुन त्यामुळे या हक्कास बाधा येईल असा हुकूम करणेचा अधिकार या कोर्टास नाही. वादीस चुकीची मोजणी झाली असेल तरच या कोर्टात त्या मोजणीविरुध्द दादा मागणेचा अधिकारी आहे. त्यामुळे दावा प्री मॅच्युआर असलेने रद्द होणेस पात्र आहे. प्रस्तुत दावा व अर्ज कायदेशीर नसुन दाव्यास कसलेही कारण घडलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

९. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन पुढील मुद्दे माझ्या समक्ष उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | सकृत दर्शनी केस वादीच्या बाजुने आहे, हे वादी सिद्ध करतो का? | **नाही.** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे, हे वादी सिद्ध करतो का? | **नाही.** |
| ३. | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी सिद्ध करतो का? | **नाही.** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज निशाणी क्रं. ५ नामंजुर करण्यात येतो.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करीताः–**

**१०.** मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी सलग्न असल्याने चर्चेची वारंवारता टाळण्याकरीता सर्व मुद्दयांची कारणमिमांसा मी एकत्रीत नोंदवित आहे. वादी यांचे विद्वान वकिल श्री. बी. आर. भिलारे यांचा सखोल युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्जानुसार सखोल युक्तीवाद केला. मी अर्ज व सर्व कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला. तसेच प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. आर. कुलकर्णी यांनी निशाणी क्रं. २६ वरील म्हणण्याप्रमाणे सखोल युक्तीवाद केला.

११. वादीच्या कथनांनुसार, दावा मिळकत पुर्वी वादी, प्रतिवादी व त्यांचे आई – वडील, भाऊ यांचे वडीलार्जीत मालकी वहिवाटीची होती. वादी, प्रतिवादी व त्यांचे वारस यांचेमध्ये गट क्रं. ८१ ही संपुर्ण शेतजमीन एकत्रात असताना सन १९९४ साली दावा मिळकत महाराष्ट्र शासनाने पाझर तलावासाठी संपादित केली. त्यानंतर वादीने माळशिरस येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.२५/१९९५ रोजी वाटपा करीता दावा दाखल केलेला होता. त्यानुसार वादी, प्रतिवादी व त्यांचे भाऊ, आई वडील यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप झाले. त्यानंतर प्रतिवादी याने मे. कोर्टात प्रतिवादीने दावा मिळकतीचा बनावट ७/१२ उतारा तयार करुन त्याचे नाव नोंद केलेले होते व सदर उतारा रद्द झालेला आहे.

१२. प्रतिवादीने राजकीय दबाव आणुन ग्रामसेवक कोंडबावी यांची बनावट सही करुन भुमि अभिलेख माळशिरस यांचेमार्फत दावा मिळकतीची मोजणी करण्याचा प्रयत्न केला व सदर जमीन स्वतःचे मालकीची आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादीने महसुल अधिका–यांशी संगनमत करुन उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांचेमार्फत दावा मिळकतीची मोजणी मागितली परंतु आवश्यक पक्षकारांना नोटीस पाठविली नाही व आजतागायत मोजणी झालेली नाही. सदर दावा मिळकत संपादित करताना त्याच्या हद्दीखुणा केलेल्या नाहीत अथवा कब्जा नाही याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी सदर मिळकत हडप करण्याच्या प्रयत्नात आहे. वास्तविकता गट क्रं. ८१ या जमीनीची मोजणी करावयाची झाल्यास सर्व पोटहिश्याची मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त दावा मिळकतीची मोजणी करता येणार नाही. तसेच लगत सर्व शेतकरी यांना मोजणी नोटीस देणे बंधनकारक आहे.

प्रतिवादीने मोजणीच्या आधारे स्वतःचीच मालकी सांगुन कब्जा घातलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे.

**१३.** याउलट प्रतिवादीने केलेल्या कथनांनुसार, दावा मिळकत ही जिल्हा परिषद मार्फत पाझर तलावासाठी संपादीत झाली असुन त्यात वादी अथवा प्रतिवादीचा काहीही हक्क हितसंबंध नाही. सदरचे पाझर तलाव क्षेत्र हे ग्रामपंचायतीचे ताब्यात आहे. वादीची जमीन दावा मिळकतीलगत असलेने वादीने सरकारी क्षेत्रात अतिक्रमण करुन वहिवाट घातली आहे व त्यात विहिर व बोअर पाडले असुन वादी अतिक्रमीत क्षेत्र बेकायदेशीर वहिवाटीत आहे. त्याप्रमाणे प्रतिवादीने तक्रार केले नंतर ग्रामपंचायत कोंडबावी यांनी पाझर तलावाचे क्षेत्र मोजणी करुन अतिक्रमण काढुन घ्यावे असा आदेश झालेनंतर मोजणी मागविली आहे. त्यामुळे या मोजणीशी प्रतिवादीचा काहीही संबंध नसुन प्रतिवादीस मोजणी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देता येणार नाही. तसेच ग्रामपंचायत कोंडबावी यांना सदर दाव्यात पक्षकार सामील केलेले नाही. प्रस्तुत दावा व अर्ज बेकायदेशीर असुन दाव्यास प्रतिवादी विरुध्द कसलेही कारण घडलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**१४.** अर्ज, म्हणणे व सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले, दावा मिळकत गट क्रं. ८१/१/अ/२/अ/२/ब याची प्रतिवादीच्या सांगण्याप्रमाणे ग्रामपंचायत कोंडबावी यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख माळशिरस यांचेमार्फत मोजणी करु नये याकरीता दाखल केलेला आहे. वास्तविक पाहता, गट क्रं. ८१/१/अ/२/अ/२/ब

हा महाराष्ट्र शासन पाझर तलाव यांच्या नावे क्षेत्र २.५६ हे.आर संपादित केलेले आहे. त्याचा ७/१२ हा महाराष्ट्र शासन पाझर तलाव यांच्या नावे आहे. प्रतिवादीच्या कथनांनुसार, वादीने सदर पाझर तलावाच्या क्षेत्रात अतिक्रमण केलेले आहे. याउलट वादीच्या कथनांनुसार प्रतिवादीने खोटया सहया करुन ग्रामपंचायत कोंडबावी यांच्यावर दबाव आणुन उपअधिक्षक भूमी अभिलेख माळशिरस यांचेमार्फत मोजणी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**१५.** वादी तर्फे दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, निशाणी क्रं. २० लगत हद्दीकायम मोजणी नोटीस दाखल केलेली आहे. सदर नोटीस ही उपअधिक्षक भूमी अभिलेख माळशिरस यांनी महाराष्ट्र शासन पाझर तलाव यांच्या नावे दिलेली आहे. दावा मिळकत ही प्रतिवादीच्या नावे दिसुन येत नाही. सदर मिळकतीची मोजणी करण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार हा महाराष्ट्र शासन पाझर तलावाकरीता ग्रामपंचायत कोंडबावी यांना असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. प्रस्तुत दाव्यामध्ये ग्रामपंचायत कोंडबावी यांना पक्षकार केलेले नाही. तसेच मोजणी करण्याचा किंवा तो थांबविण्याचा कोणताही अधिकार प्रतिवादीस दिसुन येत नाही, कारण दावा मिळकतीकरीता प्रतिवादी हा भोगवटदार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी दावा मिळकतीची मोजणी करण्याचा हक्क व अधिकार प्रतिवादीस नसल्याचे दिसते. यावरुन वादीस प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येणार नाही. शिवाय प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे असे म्हणता येणार नाही. शिवाय न्यायाचा तराजु देखील त्यांच्या बाजुने आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबतः–**

**१६.** वरील मुद्दे क्र.१ ते ३ यांची कारणमिमांसा विचारात घेतली असता वादीचे प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने आहे हे सिध्द केलेले नाही. तसेच न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे देखील सिध्द केलेले नाही. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल सिध्द केलेले नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ च्या कारणमिमांसा अन्वये सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

निशाणी क्रं. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.03.24 17:13:13 +0530

दि.२४/०३/२०२६

**(आदित्य अ. व्यास)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court :2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 24-03-2026

(d) Order uploaded on : 24-03-2026